Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18850703

# सामाजिक सुधारणा चळवळींचे परिणाम

**प्रा. परमेश्वर नारायणराव वांगकर[1] & मा. डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे[2]**

**प्रस्तावना:**

सामाजिक सुधारणा चळवळी म्हणजे समाजातील अन्यायकारक, असमान व अमानवी प्रथा नष्ट करून समता, स्वातंत्र्य, न्याय व मानवमूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी केलेले संघटित प्रयत्न होत. भारतासह जगभरात विविध काळात उदयास आलेल्या सामाजिक सुधारणा चळवळींनी सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, कायदे व राजकीय विचारसरणी यांवर दूरगामी परिणाम घडवून आणले. भारतीय समाजाची रचना ऐतिहासिकदृष्ट्या विविधता, परंपरा आणि विषमतेने भरलेली आहे. जातिव्यवस्था, धार्मिक कर्मकांड, स्त्री-अन्याय आणि आर्थिक शोषण यामुळे समाजात असमानता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर समाजसुधारणेची गरज निर्माण झाली. भारतीय समाजातील सामाजिक विषमता, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्री-असमानता व नैतिक अधःपतन यांसारख्या समस्यांवर विविध काळात अनेक समाजसुधारकांनी कार्य केले. त्यांपैकी महात्मा बसवेश्वर (इ.स. १२ वे शतक) आणि महात्मा गांधी (इ.स. २० वे शतक) हे दोन महत्त्वाचे विचारवंत व समाजसुधारक मानले जातात. दोघांचे कालखंड, सामाजिक परिस्थिती व कार्यपद्धती भिन्न असल्या तरी सामाजिक समता, मानवी प्रतिष्ठा, श्रमप्रतिष्ठा आणि नैतिक मूल्ये हे समान उद्दिष्ट दिसून येते. मध्ययुगीन भारतात महात्मा बसवेश्वर यांनी वीरशैव किंवा लिंगायत चळवळीच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांनी जात, लिंग व व्यवसायावर आधारित भेदभाव नाकारून मानवकेंद्रित समाजरचनेचा विचार मांडला. दुसरीकडे, ब्रिटिश कालखंडात महात्मा गांधी यांनी सामाजिक सुधारणांना राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीशी जोडून व्यापक स्वरूप दिले. सत्य, अहिंसा, स्वावलंबन व नैतिकता या मूल्यांवर आधारित गांधीवादी विचारांनी भारतीय समाजाचे नैतिक अधिष्ठान बळकट केले.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये *महात्मा बसवेश्वर व महात्मा गांधी* यांच्या सामाजिक सुधारणा चळवळींचा अभ्यास करून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक परिणाम विश्लेषित करण्याचा प्रयत्न केला आहे.

महात्मा बसवेश्वर (इ.स. 1131-1167) हे कर्नाटकातील कल्याण येथे कार्यरत असलेले महान समाजसुधारक, तत्त्वज्ञ व प्रशासक होते. त्यांनी कल्याणी चालुक्य राजदरबारात मंत्री म्हणून कार्य केले. त्यांच्या सामाजिक विचारांचा केंद्रबिंदू मानवमूल्ये व समता हा होता. तर महात्मा गांधी (1869-1948) हे आधुनिक भारताचे प्रमुख नेते, विचारवंत व

[1]संशोधक विद्यार्थी, परभणी ,M.A. (HIS), SET, NET.
[2] Ph.D. मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, यशवंत महाविद्यालय, नांदेड

समाजसुधारक होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले आणि सामाजिक सुधारणांना व्यापक राष्ट्रीय स्वरूप दिले.

❖ **सामाजिक सुधारणा चळवळींचे प्रमुख परिणाम:**

**१) सामाजिक समता व सामाजिक न्यायाची स्थापना:** सामाजिक समता व सामाजिक न्याय ही आधुनिक लोकशाही समाजाची मूलभूत तत्त्वे आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान मान, हक्क व संधी मिळाव्यात, तसेच ऐतिहासिक अन्याय, शोषण व विषमता दूर व्हावी, यासाठी सामाजिक समता व सामाजिक न्यायाची स्थापना आवश्यक ठरते. या संकल्पना सामाजिक सुधारणा चळवळी, लोकशाही मूल्ये व संविधानिक तरतुदी यांवर आधारलेल्या आहेत. सामाजिक सुधारणा चळवळींमुळे जातीय विषमता, अस्पृश्यता, वर्णभेद व धार्मिक भेदभावाला मोठ्या प्रमाणावर आव्हान मिळाले. समानतेचा विचार समाजात रुजवून सर्व नागरिकांना समान अधिकार व संधी मिळाव्यात, यासाठी या चळवळींनी जनजागृती केली. परिणामी सामाजिक न्यायाची संकल्पना दृढ झाली. बसवेश्वरांनी जन्माधारित जातिव्यवस्थेला स्पष्टपणे नाकारले. व्यक्तीचे महत्त्व तिच्या कर्मावर आधारित असावे, जन्मावर नव्हे, असा त्यांचा ठाम आग्रह होता. यामुळे समाजातील दलित व शोषित वर्गाला आत्मसन्मान मिळाला.

**२) स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत परिवर्तन:** म. बसवेश्वरांनी स्त्रियांना धार्मिक, सामाजिक व बौद्धिक स्वातंत्र्य स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला. अक्कमहादेवीसारख्या स्त्री संतांचा उदय याच चळवळीमुळे झाला. स्त्री-पुरुष समानतेचा विचार त्या काळात क्रांतिकारी ठरला. पुढे २० व्या शतकात महिलांचा राष्ट्रीय व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग वाढला, ज्यामुळे स्त्रीजागृतीला चालना मिळाली. महिलांना राष्ट्रीय चळवळीत सर्वप्रथम सामील करून घेण्याचे श्रेय म. गांधी यांनाच द्यावे लागेल.

स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य व स्त्री हक्क यांचा पुरस्कार सामाजिक सुधारणा चळवळींनी केला. बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीत्व व हुंडा प्रथा यांसारख्या अनिष्ट प्रथांना विरोध करण्यात आला. यामुळे स्त्रियांची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती सुधारली आणि स्त्री सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.

**३) शिक्षण व बौद्धिक जागृती:** सामाजिक सुधारणा चळवळींमुळे समाजात शिक्षणाचा प्रसार होऊन बौद्धिक जागृती निर्माण झाली. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही जाणीव या चळवळींमुळे लोकांमध्ये निर्माण झाली. सामाजिक सुधारणा चळवळींनी आधुनिक शिक्षण, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन व विवेकवादाचा प्रसार केला. शिक्षणामुळे समाज अंधश्रद्धा, कर्मकांड व रूढींपासून मुक्त होण्यास मदत झाली. अंधश्रद्धा, कर्मकांड व रूढीपरंपरांना *तर्काच्या आधारे आव्हान* दिले गेले. लोकांमध्ये प्रश्न विचारण्याची व विवेकाने विचार करण्याची सवय लागली. शिक्षणसंस्थांच्या स्थापनेमुळे समाजात बौद्धिक परिवर्तन घडून आले. वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तके, नाटके यांच्या माध्यमातून *प्रबोधनात्मक विचारांचा प्रसार* झाला.

**४) राजकीय जाणीव व लोकशाही मूल्यांचा विकास:** सामाजिक सुधारणा चळवळींमुळे समाजात केवळ सामाजिकच नव्हे तर राजकीय जाणीवही निर्माण झाली. लोकांना स्वतःचे हक्क, कर्तव्ये व लोकशाही मूल्यांचे महत्त्व समजू लागले. महात्मा बसवेश्वर यांनी मांडलेली *अनुभव मंडप* ही संकल्पना लोकशाही विचारांची पूर्वपीठिका ठरली. त्यातून सर्वसामान्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळाली. सामाजिक सुधारणांमुळे लोकांमध्ये हक्क, कर्तव्ये व स्वातंत्र्य यांची जाणीव निर्माण झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ही लोकशाही मूल्ये समाजात रुजली. अनेक सामाजिक सुधारणा चळवळींनी पुढे राष्ट्रीय चळवळींना वैचारिक अधिष्ठान दिले.

**५) सांस्कृतिक परिवर्तन व नैतिक मूल्यांचा विकास:** या चळवळींनी समाजातील जड परंपरा, अवैज्ञानिक श्रद्धा व अमानवी रूढी यांचे पुनर्मूल्यांकन केले. मानवतावाद, सहिष्णुता, करुणा व सामाजिक ऐक्य यांसारख्या नैतिक मूल्यांना प्रोत्साहन मिळाले. समाज अधिक समावेशक व सुसंस्कृत बनण्यास मदत झाली. आधुनिक सांस्कृतिक परिवर्तनातून लोकशाही, मानवाधिकार, पर्यावरण जाणीव, सामाजिक समावेशन व जागतिक बंधुता यांसारखी मूल्ये विकसित होत आहेत. त्याचबरोबर भौतिकवाद, स्वार्थ व मूल्यसंघर्ष ही आव्हानेही निर्माण झाली आहेत.

**६) आर्थिक व कामगार सुधारणा:** कामगारांचे शोषण, वेठबिगारी व अन्यायकारक कामगार पद्धतींविरुद्ध सामाजिक सुधारणा चळवळींनी आवाज उठवला. न्याय्य वेतन, सुरक्षित कामाच्या अटी व कामगार हक्क यांचा पुरस्कार करण्यात आला. यामुळे आर्थिक न्यायाची संकल्पना बळकट झाली.

**७) कायदेशीर व संस्थात्मक बदल:** सामाजिक सुधारणा चळवळींच्या दबावामुळे अनेक सुधारक कायदे अस्तित्वात आले. अस्पृश्यता निवारण, स्त्री हक्क संरक्षण व सामाजिक समतेसाठी घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या. सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना व चळवळींचा विकास झाला.

**८) स्त्रीसमानता:** पूर्वी भारतीय समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जात होते. शिक्षण, मालमतेचे हक्क, स्वातंत्र्य यांपासून ती वंचित होती. सामाजिक सुधारणा चळवळींमुळे या परिस्थितीत मोठा बदल घडून आला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई यांसारख्या समाजसुधारकांनी *मुलींच्या शिक्षणावर भर* दिला. स्त्रीशिक्षणामुळे स्त्रिया *स्वावलंबी, आत्मविश्वासू* बनल्या. शिक्षणामुळे स्त्रियांना स्वतःचे हक्क आणि कर्तव्ये समजू लागली. *सतीप्रथा,* **बालविवाह, केशवपन, विधवांवरील अन्याय** यांना विरोध करण्यात आला. विधवाविवाहाला मान्यता मिळाली आणि स्त्रियांचे सामाजिक जीवन सुधारले. स्त्रियांना *वारसा हक्क, मतदानाचा अधिकार, घटस्फोटाचा हक्क* मिळाला. कायद्याने स्त्री-पुरुष समानतेला मान्यता दिली. तसेच स्त्रिया शिक्षण, नोकरी, राजकारण, समाजकार्य अशा क्षेत्रांत सक्रिय झाल्या. त्यामुळे स्त्री ही केवळ गृहिणी नसून *समाजाची समान घटक* आहे, ही जाणीव निर्माण झाली. पुरुषप्रधान विचारसरणीला आव्हान मिळाले.

**९) स्त्री सक्षमीकरण:** म. बसवेश्वरांनी *लिंगभेद नाकारणारा समाज* निर्माण करण्याचा आग्रह धरला. *"स्त्री-पुरुष भेद ईश्वरनिर्मित नाही"* असा त्यांचा विचार होता. अनुभव मंटप हे *लोकशाही स्वरूपाचे वैचारिक व्यासपीठ* होते. आपणास

अक्का महादेवींच्या वचनांतून *स्त्री आत्मभान आणि विद्रोह* दिसतो. थोडक्यात बसवेश्वरांनी स्त्री सक्षमीकरणाला *धार्मिक-सामाजिक समतेचा आधार* दिला.

त्याचप्रमाणे गांधीजींनी स्त्रीच्या *अहिंसक शक्तीला सामाजिक परिवर्तनाचे साधन* मानले. स्त्री ही "दुर्बल" नसून **नैतिकदृष्ट्या सबळ** आहे असा विचार त्यांनी मांडला. गांधीजींनी स्त्रियांना *स्वातंत्र्य चळवळीचे केंद्रबिंदू* बनवले. यामुळेच असहकार, सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह यात मोठ्या प्रमाणात स्त्री सहभाग होता. त्यातूनच कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे नेतृत्व उभे राहिले. थोडक्यात गांधीजींनी स्त्री सक्षमीकरणाला *राजकीय, आर्थिक व नैतिक अधिष्ठान* दिले.

**१०) ग्रामस्वराज्य व आत्मनिर्भरता:** सध्या केंद्र मार्फत 'आत्मनिर्भर भारत' यावरती भर दिला जात आहे. वास्तविक पाहता या संकल्पनेची मुळे महात्मा गांधी यांच्या विचारात आढळतात. त्यांनीच सर्वप्रथम *'खेड्यांकडे चला'* हा नारा दिला आणि 'स्वयंपूर्ण खेड्यांची' योजना मांडली आणि खादी व ग्रामोद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचे सशक्तीकरण झाले.

**११) कायाक (श्रम) सिद्धांत:** *कायाकवे कैलास* या तत्त्वज्ञानाद्वारे बसवेश्वरांनी श्रमाला धार्मिक व सामाजिक प्रतिष्ठा दिली. कोणताही व्यवसाय हीन नाही, ही संकल्पना त्यांनी समाजात रुजवली. यामुळे श्रमाधिष्ठित समाजरचनेचा पाया घातला गेला.

### ❖ सामाजिक सुधारणा चळवळींचे दीर्घकालीन परिणाम

सामाजिक सुधारणा चळवळींनी केवळ तात्कालिक बदल घडवून आणले नाहीत, तर समाजाच्या रचना, मूल्यव्यवस्था व विचारसरणीवर दीर्घकालीन आणि टिकाऊ परिणाम केले आहेत. भारतीय समाजाच्या इतिहासात या चळवळींनी सामाजिक परिवर्तनाचा भक्कम पाया घातला. सामाजिक सुधारणा चळवळींचा प्रभाव केवळ तत्कालीन बदलांपुरता मर्यादित न राहता दीर्घकालीन स्वरूपाचा आहे. आधुनिक समाजाची मूल्यव्यवस्था, लोकशाही रचना व सामाजिक न्यायाची तत्त्वे या चळवळींच्याच परिणामस्वरूप विकसित झाली आहेत. चळवळींच्या परिणामस्वरूप भारतीय समाजात जातिभेदाला आव्हान मिळाले, श्रमप्रतिष्ठा निर्माण झाली, स्त्रीसमानतेची जाणीव वाढली आणि नैतिक मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले. आधुनिक संविधानातील समता व सामाजिक न्यायाच्या मूल्यांवर या विचारांचा प्रभाव दिसून येतो. दीर्घकालीन स्वरूपात पाहता, जातिभेद, अस्पृश्यता व सामाजिक विषमतेविरोधात जनजागृती झाली. समता, बंधुता व सामाजिक न्याय ही मूल्ये समाजाच्या नैतिक अधिष्ठानाचा भाग बनली. कायद्यापुढील समानता व मानवाधिकारांची संकल्पना दृढ झाली. सामाजिक सुधारणा चळवळींच्या विचारांमधूनच भारतीय संविधानाची रचना झाली. मूलभूत हक्क, सामाजिक व शैक्षणिक मागास घटकांसाठी आरक्षण, स्त्री-पुरुष समानता, अस्पृश्यता निर्मूलन यांसारख्या तरतुदी दीर्घकालीन परिणामांचे ठळक उदाहरण आहेत. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, स्त्रीहक्क व लैंगिक समानतेच्या चळवळींमुळे

स्त्रियांची सामाजिक भूमिका बदलली. आज शिक्षण, नोकरी, राजकारण व प्रशासनात स्त्रियांचा सहभाग वाढलेला दिसतो, हा दीर्घकालीन परिणाम आहे.

सुधारणा चळवळींनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद व सामाजिक जाणीव वाढीस लागली. शिक्षणाच्या प्रसारामुळे अंधश्रद्धा व परंपरावादाला आव्हान देण्याची मानसिकता निर्माण झाली. या चळवळींनी सामान्य जनतेमध्ये हक्क व कर्तव्यांची जाणीव निर्माण केली. यामुळे लोकशाही मूल्ये बळकट झाली आणि नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला. सामाजिक प्रश्नांना राजकीय व्यासपीठ मिळाले. सामाजिक सुधारणा चळवळींमुळे संघटन, आंदोलन व शांततामय संघर्षाची संस्कृती विकसित झाली. पुढील काळातील दलित, आदिवासी, शेतकरी, कामगार व पर्यावरण चळवळींना याच परंपरेतून प्रेरणा मिळाली.

**निष्कर्ष**:

महात्मा बसवेश्वर व महात्मा गांधी दोघांचाही भर सामाजिक समतेवर होता. बसवेश्वरांची चळवळ प्रामुख्याने धार्मिक-सामाजिक स्वरूपाची होती, तर गांधींची चळवळ सामाजिक-राजकीय स्वरूपाची होती. बसवेश्वरांनी मध्ययुगीन समाजात वैचारिक क्रांती घडवली, तर गांधींनी आधुनिक भारतात त्या विचारांना जनआंदोलनाचे स्वरूप दिले. सामाजिक सुधारणा चळवळींनी समाजाला विषमतेकडून समतेकडे, अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि अन्यायकडून न्यायाकडे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. संशोधनाच्या दृष्टीने पाहता, या चळवळी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मूलभूत भूमिका बजावतात आणि आजच्या आधुनिक समाजाच्या घडणीत त्यांचे योगदान अमूल्य आहे.

**संदर्भसूची (References)**

१. माझे सत्याचे प्रयोग - म. गांधी

२. भारतीय समाजसुधारक - रा. ग. देशमुख

३. महात्मा बसवेश्वरांचे विचार - शरणबसवप्पा

४. Social Background of Indian Nationalism - A. R. Desai

५. भारतातील सामाजिक चळवळी - घनश्याम शाह

६. भारतातील स्त्री चळवळ : इतिहास व वर्तमान - डॉ. अंजली देशमुख.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*